'' ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार''

– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे



Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

# PADMABHUSHAN Dr. VASANTRAODADA PATIL MAHAVIDYALAYA, TASGAON

Tal.: Tasgaon, Dist.: Sangli Ph. (02346) 250665

**NAAC Reaccredited College : B++ Grade**

# PROSPECTUS

2017-18

## SENIOR WING



श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर

## * संस्थेची प्रार्थना *

हरे राम हरे राम राम राम हरे हरे
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे
राम कृष्ण रहीम ख्रिस्त
बुध्द झरतुष्ट्र ।
महावीर मानवसंत मानव्याचे दिपस्तंभ
लीन दीन होऊन त्यांचे
वंदूया चरण ।
सत्य, शील, प्रामाणिकता,
त्याग पिळवणुकीस आळा
मानव्याचे अधिष्ठान
ईशतत्व दर्शन ।
यांचे ज्ञान नि विज्ञान हाच सुसंस्कार ।
विवेकाच्या आनंदाचा लाभ शिक्षणांत
हरे राम हरे राम राम राम हरे हरे
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे

- पूज्य बापूजी साळुंखे

अग्ने नय सुपथा राये अस्मान्
विश्वनि देव वयुनानि विद्वान ।
युयोध्यस्मज्जुहुराणमेनो
भूयिष्ठां ते नम उक्ति विधेम्।।

- ईश्वास्योपनिषद

## ✻ प्रवेशाबाबत सूचना ✻

महाराष्ट्र शासन निर्णयानुसार गतवर्षी या महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनाच पुढील वर्गात प्राधान्याने प्रवेश दिले जातील व त्यानंतर इतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना गुणवत्ता यादीनुसार प्रवेश दिला जाईल.

१) महाविद्यालयामध्ये १-६-२०१६ पासून माहितीपत्रक विक्री केले जाईल.

२) इ. १२ वी च्या निकालानंतर बी.ए. भाग-१, बी.कॉम. भाग-१ व बी.एस्सी. भाग-१ वर्गाची प्रवेशप्रक्रिया सुरू होईल.

३) बी.ए. भाग-२, बी.कॉम.भाग-२ व बी.एस्सी. भाग-२ या वर्गाचे प्रवेश दि. १६ ते १९ जून २०१६ या दरम्यान देण्यात येतील.

४) बी.ए. भाग ३, बी. कॉम. ३ व बी.एस्सी. भाग -३ या वर्गाचे प्रवेश दि. १० ते १५ जून २०१६ या दरम्यान देण्यात येतील.

५) सर्व वर्गाच्या प्रवेशाबाबतच्या सूचना काचफलकात लावण्यात येईल.

६) प्रवेश कमिटीच्या कामकाजाची वेळ सकाळी ८ ते १ पर्यंत राहील.

७) महाविद्यालय दि. १५ जून २०१६ रोजी सुरू होईल.

**- कार्यालयीन वेळ -**

सोमवार ते शुक्रवार सकाळी ९-०० वा. ते सायं. ५-३० वा. पर्यंत व
शनिवार सकाळी ९-०० वा. ते दुपारी १२-०० वा.

## ✻ ठळक वैशिष्ट्ये ✻

- प्रशस्त इमारत-पुरेशा वर्ग खोल्यांची व्यवस्था
- रम्य परिसर आणि शैक्षणिक वातावरण.
- प्रशिक्षित, अनुभवी व तज्ज्ञ प्राध्यापक
- १२ वी बोर्ड परीक्षेच्या निकालाची उज्ज्वल परंपरा.
- प्रशस्त इमारतीमध्ये समृद्ध ग्रंथालय, अभ्यासिकेची स्वतंत्र व्यवस्था.
- गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांकरिता बुक बँकेमार्फत मोफत पुस्तक संच.
- गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी 'कमवा व शिका' योजना
- घटक चाचणी, सराव परीक्षा या द्वारे गुणवत्तावाढीसाठी खास प्रयत्न.
- वैद्यकीय व अभियांत्रिकी प्रवेशपरीक्षा (MH-CET) मार्गदर्शन वर्ग.
- विज्ञान विभागासाठी सुसज्ज्य प्रयोगशाळा
- भव्य क्रीडांगण (स्टँडर्ड ट्रॅक आणि अत्याधुनिक क्रीडा साहित्यासह )
- सुसज्ज व्यायामशाळा. देशी- विदेशी खेळांचे प्रशिक्षण व मार्गदर्शन.
- एन.सी.सी. विभागाची सोय. पोलिस भरती प्रशिक्षण व मार्गदर्शन.
- व्यवसायाभिमुख शिक्षण व विविध स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन वर्ग.
- महाराष्ट्र शासनमान्य संगणक ( कॉम्प्युटर ) प्रशिक्षण केंद्र.
- पदव्युत्तर रसायनशास्त्र अभ्यासक्रमाची सोय.
- सुसज्ज रसायनशास्त्र संशोधन प्रयोगशाळा.
- स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र
- वक्तृत्त्व, वादविवाद, निबंध स्पर्धेसाठी विशेष मार्गदर्शन.
- एम.एस्सी. प्रवेशाबाबत मार्गदर्शन
- सर्व विभागासाठी स्वंतत्र अध्यापन कक्ष



Rs. 50/-

Shree Sainath Printing Press, Karad

।। ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार ।।–शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

**श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्था, कोल्हापूर संचालित**

# पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव

## ◆ प्रास्ताविक ◆

### श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्था, कोल्हापूर

व्यक्ती आणि समाज, देश यांच्या आयुष्यात काही प्रगतीचे टप्पे असतात त्या प्रत्येक टप्प्यावर विकासाच्या दिशा निश्चित होतात आणि उदिष्टाप्रत जाण्यासाठी नियोजन आणि संकल्पना प्रभावीपणे अंमलात आणल्या जातात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राष्ट्रीय चारित्र्य जपणारे शिक्षणतज्ज्ञ, समाजधुराण जाणत्या नेतृत्वांनी राष्ट्राला प्रगतशील बनविण्यासाठी शिक्षण हा एकच उपाय जाणला. शिक्षणाचा महाराष्ट्राला, देशाला वारसा देण्याचे काम महात्मा फुले, राजर्षि शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या कर्त्या समाजसुधारकांनी केले त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याचे काम क्रांतीपुत्र शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी अविरतपणे केले. विद्यार्थीदशेत बापूजींनी श्रीराम शिक्षण प्रसारक मंडळाची इस्लामपूरात स्थापना करून पंधरा प्राथमिक शाळा काढल्या आणि आपल्या त्यागी जीवनाची समाजाला जाणीव करून दिली.

स्वातंत्र्यानंतर सुराज्याचे स्वप्न पाहणाऱ्या नव्या पिढीला गतीमान शिक्षण देण्यासाठी उच्चशिक्षणाच्या सुविधा देणे गरजेचे आहे. याची जाण डॉ. बापूजींना झाली “ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार” या ध्येयाने प्रेरीत होऊन जून १९५४ साली श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केली. डॉ. बापूजी आणि संस्थामाता सौ. सुशिलादेवी साळुंखे मुलांचे माता पिता बनले. शिक्षणाचे अविरत कार्य करताना डॉ. बापूजींना अनंत अडचणी आल्या परंतु ध्येयनिष्ठा आणि सत्यनिष्ठेपुढे त्या तोडक्या, थिट्या पडल्या आणि महाराष्ट्रभर श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची ज्ञानकेंद्रे विकसीत होवू लागली त्यांच्या कार्यात असंख्य गुरूदेवकार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते सामील झाले. डॉ. बापूजींच्या पावलांचा स्पर्श ज्या गावांना झाला ती गावे बापूजीमय संस्थामय बनली आज महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्याच्या एकूण बारा जिल्ह्यामध्ये पुणे, मुंबई, शिवाजी विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात १८ आर्टस्, कॉमर्स व सायन्स वरिष्ठ महाविद्यालये एक वरिष्ठ कन्यामहाविद्यालय तीन अध्यापक महाविद्यालये एक कायदा महाविद्यालय अशी २३ महाविद्यालये एक डी.फार्मसी १५४ माध्यमिक महाविद्यालय, ६६ उच्चमाध्यमिक महाविद्यालये, १२ गर्ल्स हायस्कूल, २ रात्रप्रशाला, ११ विना अनुदान माध्यमिक विद्यालये, ४ तांत्रिक विद्यालये, १ प्रॅक्टिसिंग स्कूल, १ पोष्ट बेसिक आश्रमशाळा, २ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, १ विस्तार सेवा केंद्र १६ मुलींची वसतिगृहे, १४ प्राथमिक शाळा व बालवाड्या, ३ इंग्रजी माध्यमाच्या शाळा अशी ३७४ सांस्कृतिक केंद्रे ज्ञानदानाचे अखंडीत कार्य आठ हजार गुरूदेवकार्यकर्त्यांच्या माध्यमातून करत आहेत. आज महाराष्ट्रात श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे नाव गुणवत्तेच्या क्षेत्रात आघाडीवर आहे. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा प्रचंड आशिर्वाद, संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांचे मातृत्वाचे छत्र आणि आमच्या संस्थेचे अध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांची विशाल सह्यदयाता, दूरदृष्टी नेतृत्व यामुळे आम्ही गरूड भरारी घेऊ शकलो. महाराष्ट्राच्या शिक्षणक्षेत्राचा इतिहास लिहताना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे, संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांच्या त्यागाचा इतिहास सुवर्णक्षरांनी लिहावा लागेल.

## पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगांव

प्रगती आणि किर्तीचा मंगल कलश सदैव हाती असणाऱ्या सांगली जिल्ह्याच्या विकासात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी स्थापन केलेल्या श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे योगदान अत्यंत महत्वपूर्ण आहे. डॉ. बापूजी साळुंखे आणि सांगली जिल्ह्याचा जिव्हाळा अतुलनीय असून बापूजींच्या त्यागपरीस स्पर्शाने जिल्ह्यात ज्ञानगंगोत्री विविध संस्कार केंद्राच्या माध्यमातून आला उच्च शिक्षण ही काळाची गरज ओळखून डॉ. बापूजींनी जी पहिली पाच महाविद्यालये स्थापन केली त्यापैकी तासगाव येथे, जून १९६२ साली कला व वाणिज्य या नावाने अवघ्या ६२ विद्यार्थ्यांवरती हे महाविद्यालय सुरू झाले. काळाच्या ओघात शिक्षणाचे पर्यायाने महाविद्यालयाचे प्रारूप बदलत जाणे ही शिक्षण व्यवस्थेतील अंगभूत अशी गरज असते त्यानुसार या महाविद्यालयात जून १९८२ साली संस्थेने सायन्स विभाग सुरू केला. या महाविद्यालयाची दिवसागणिक होणारी प्रगती, वाढणारा लौकिक शिवाजी विद्यापीठात गुणवत्तेची यशोगिरी नेहमीच अभिमानास्पद राहिली आहे. संस्थेचे थोर हितचिंतक व सांगली जिल्ह्याचे सुपूत्र कै. पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील यांची स्मृती तासगाव नगरीत कायम तेवत ठेवण्यासाठी व त्यांच्या कार्याचे उचित स्मारक व्हावे म्हणून सन १९९१ मध्ये या महाविद्यालयाचे पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय तासगाव असे नामकरण करण्यात आले.

महाविद्यालयाचा आज जो शिवाजी विद्यापीठात गुणवत्तेचा जो गौरव होतो आहे त्यापाठीमागे संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांची दूरदृष्टी कारणीभूत आहे. त्यांनी विद्यार्थी हा विकासाचा केंद्र मानून संस्थेचे सचिव असल्यापासूनच विषयाचा गाढा व्यासंग असलेले प्राध्यापक व महाविद्यालयाच्या विकासाला सहाय्यभूत असे प्राचार्य नियुक्त केले. बाह्यवळण रस्त्यामुळे अनंत अडचणीवरती मात करीत मी महाविद्यालयाचा प्राचार्य या नात्याने चार्ज घेतल्यानंतर भव्य दिव्य इमारत बांधली, सायन्स विभागाच्या स्वतंत्र लॅबोरेटरी तयार केल्या. एम.ए., एम.एस्सी., पी.एच.डी. पर्यंतच्या शिक्षणाच्या सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या. आज डिजिटल वर्गाची संकल्पना पुढे येत आहे. भविष्यात सर्वच परीक्षा ऑनलाईन पध्दतीने सुरू होणार असल्याचे आजचे चित्र आहे अशा अवस्थेत लवकरच अत्याधुनिक तंत्रज्ञानाने हे महाविद्यालय सुसज्ज होईल सध्या या महाविद्यालयात ५००९ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या परिसरात भूषण ठरेल अशा ज्युनिअर कला, वाणिज्य, विज्ञान शाखा निकालाची उत्कृष्ठ परंपरा जपत आहोत. नजदीकच्या काळात या महाविद्यालयाचे नॅक समितीकडून पुर्नमूल्यांकन होणार असून मला आत्मविश्वास आहे आम्ही **'A'** ग्रेड मानांकन नक्कीच मिळवू. महिला वसतिगृहाच्या माध्यमातून उच्च शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या मुलींची सोय आम्ही केल्याने मुलींची संख्याही विद्यार्थी संख्येच्या पेक्षा अधिकच झाली आहे. हे महाविद्यालय विकसीत होत असताना आमच्या संस्थेचे संस्थापक, संकल्पक शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा आशिर्वाद, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचे नेतृत्व, संस्था सचिव प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. अशोक आबा कारंडे (सहसचिव-प्रशासन) प्राचार्य पी. एस. चव्हाण (सहसचिव-अर्थ) या परिसरातील राजकीय, सामाजिक कार्यकर्ते, संस्थेचे हितचिंतक, महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थीनी, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी या सहकार्यामुळे मी आज सांगली जिल्ह्यात व शिवाजी विद्यापीठ क्षेत्रात महाविद्यालय गुणवत्तेच्या क्षेत्रात अग्रेसर करण्यात यशस्वी झाले. विद्यार्थी मित्रानो, आज महाविद्यालयात प्रवेशासाठी स्पर्धा प्रचंड आहे आपण वेळीच महाविद्यालयात प्रवेश घेतला तर भविष्यात अडचणी येणार नाहीत हे महाविद्यालय शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी तुमच्या विकासासाठी सुरू केले आहे. मी या महाविद्यालयाचा प्राचार्य या नात्याने महाविद्यालयाच्या प्रगतीस सदैव कटिबध्द राहीन. अशी ग्वाही देतो.

**डॉ. आर. आर. कुंभार**

प्राचार्य

महाविद्यालयात अध्यापनाचे काम दि. १२ जून २०१७ पासून सुरू होईल.

## ।। महाविद्यालयातील अभ्यासक्रम ।।

### ■ कला शाखा ( Arts Faculty) ■

**विशेष सूचना –** बी.ए. भाग १ ला निवडलेल्या **चार** ऐच्छिक विषयापैकीच बी.ए. भाग २ ला **दोन** ऐच्छिक विषय निवडता येतील. बी.ए. भाग-२ ला निवडलेल्या **दोन** ऐच्छिक विषयापैकीच बी.ए. भाग-३ ला **एक** स्पेशल विषय निवडावा लागतो. हे लक्षात घेऊनच विद्यार्थ्यांनी बी.ए. भाग-१ साठी विषयाची निवड काळजीपूर्वक करावी.

### ◆ प्रथम वर्ष कला ( बी.ए. भाग-१)

प्रत्येक विद्यार्थ्यास एकूण **सहा** विषय घ्यावे लागतात. त्यापैकी **दोन** आवश्यक व **चार** ऐच्छिक विषय निवडावेत.

**आवश्यक** (Compulsory) विषय – **दोन**

१) इंग्रजी  २) मराठी / हिंदी

**ऐच्छिक** (Optional) विषय – **चार** खालील **'अ'** व **'ब'** गटातील प्रत्येकी दोन विषय निवडावेत. तथापि **'अ'** गटातील इंग्रजी (ऐच्छिक) विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांना इतर भाषा विषय घेण्याची आवश्यकता नाही.

| गट अ – | | गट ब – | |
|---|---|---|---|
| | १) इंग्रजी / अर्थशास्त्र | | १) इतिहास |
| | २) मराठी / हिंदी | | २) समाजशास्त्र |
| | | | ३) भूगोल |
| | | | ४) राज्यशास्त्र |

**नियम :**

१) विविध विद्याशाखांच्या प्रवेश तारखा नोटीस बोर्डवर लावल्या जातील. संबधित वेळेतच प्रवेश मिळेल.

२) मराठी, इतिहास, भूगोल, समाजशास्त्र, राज्यशास्त्र या विषयांच्या दोन तुकड्या पूर्ण झाल्यानंतर या विषयांना प्रवेश मिळणार नाही.

३) बी.ए. भाग १ साठी चार ऐच्छिक विषय निवडत असताना १२ वी आर्टस्साठी असणारे विषय विचारात घेऊनच विषय निवडावेत.

४) विद्यार्थ्यांचा विषय निवडीचा अंतिम अधिकार महाविद्यालयाकडे राखून ठेवलेला आहे.

### ◆ द्वितीय वर्ष कला (बी.ए. भाग-२)

**आवश्यक** (Compulsory) विषय

१) इंग्रजी  २) आय.डी.एस. (सदर विषय निवडीसाठी खालील टेबल पहावा.)

३) पर्यावरण अभ्यास ( Environment Studies)

निवडलेल्या **दोन ऐच्छिक** विषयांशी शिवाजी विद्यापीठाने निश्चित केलेला सुसंगत **आय.डी.एस.** विषय पुढीलप्रमाणे -

| अ.क्र. | निवडलेले ऐच्छिक विषय | सुसंगत आय.डी.एस. विषय |
|---|---|---|
| १) | अर्थशास्त्र/राज्यशास्त्र/इतिहास/ समाजशास्त्र | सहकार (Co-operation) |
| २) | इंग्रजी किंवा हिंदी | मराठी साहित्याचा इतिहास (History of Marathi Literature) |
| ३) | मराठी किंवा इंग्रजी | हिंदी साहित्याचा इतिहास (History of Hindi Literature) |
| ४) | मराठी/इतिहास/समाजशास्त्र/ राज्यशास्त्र | महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास (१८१८ ते १९५०) (History of Soical Reformers in Maharashtra) |
| ५) | भूगोल | पर्यटन भूगोल (Geography of Tourism) |

**ऐच्छिक** (Optional) विषय -

बी.ए. भाग १ मध्ये घेतलेल्या चार ऐच्छिक विषयापैकी दोन ऐच्छिक विषय ( प्रत्येकी दोन पेपर) निवडावेत.

**गट 'अ'** - मराठी / हिंदी / इंग्रजी **गट 'ब'** - समाजशास्त्र /अर्थशास्त्र / इतिहास

**गट 'क'** - राज्यशास्त्र / भूगोल

### ◆ तृतीय वर्ष कला ( बी.ए. भाग-३ )

**आवश्यक** (Compulsory) विषय - इंग्रजी

**स्पेशल** विषय -

बी.ए. भाग २ मध्ये घेतलेल्या दोन ऐच्छिक विषयांपैकी एक विषय स्पेशल विषय म्हणून बी.ए. भाग ३ साठी निवडता येतो.

महाविद्यालयात शिकविण्याची सोय असलेल्या स्पेशल विषयांची यादी पुढीलप्रमाणे-

१) मराठी २) हिंदी ३) इंग्रजी ४) इतिहास ५) अर्थशास्त्र ६) समाजशास्त्र ७) राज्यशास्त्र ८) भूगोल

## ■ वाणिज्य शाखा (Commerce Faculty) ■

### ◆ बी.कॉम. भाग-१

1) English -Paper I ( Business Communication)
2) Marathi / Hindi / Principle of Marketing (Not-Grant)

3) Mathematics / Insurance
4) Bussiness Economics
5) Principles of Bussiness Management
6) Financial Accounting

### ◆ बी.कॉम. भाग-२

1) English Paper II ( English for Communication)
2) पर्यावरण अभ्यास Environment Studies
3) Bussiness Statistics
4) Coroprate Accounting
5) Fundamental of Entreprenurship
6) Bussiness Economics
7) Money and Financial System

### ◆ बी.कॉम. भाग-३

1) Bussiness Environment
2) Bussiness Regulatory Framework
3) Modern Management Practices
4) Co-op, Development
5) Adv. Accountancy Paper I & II

**OR**

Advanced Costing Papaer I & II

## ■ विज्ञान शाखा (Science Faculty) ■

### ◆ बी.एस्सी. भाग-१

**आवश्यक :-** (Compulsory) विषय - इंग्रजी (English)

**ऐच्छिक विषय :-** खालीलपैकी कोणताही एक **'अ'** किंवा **'ब'** ग्रुप निवडावा लागेल.

**'अ' ग्रुप**

१) रसायनशास्त्र (Chemistry) किंवा कॉम्प्युटर सायन्स
२) भौतिकशास्त्र (Physics)
३) गणित (Mathematics)
४) संख्याशास्त्र (Statistics )

**'ब' ग्रुप**

१) रसायनशास्त्र (Chemistry)
२) भौतिकशास्त्र (Physics) किंवा कॉम्प्युटर सायन्स
३) वनस्पतीशास्त्र (Botany)
४) प्राणी शास्त्र (Zoology)

कॉम्प्युटर सायन्स हा विषय विनाअनुदानित असलेने जादा फी भरावी लागेल.

### ◆ बी.एस्सी. भाग २

**आवश्यक :–** पर्यावरण अभ्यास (Environment Studies )

**ऐच्छिक विषय :–** खालीलपैकी कोणताही एक **'अ'** किंवा **'ब'** ग्रुप निवडावा लागेल.

| **'अ' ग्रुप** | **'ब' ग्रुप** |
|---|---|
| 1) Physics / Computer Science | 1) Chemistry |
| 2) Chemistry / Statistics | 2) Botany / Computer Science |
| 3) Mathematics | 3) Zoology |

### ◆ बी.एस्सी. भाग -३

**आवश्यक विषय :–** इंग्रजी (English)

**ऐच्छिक विषय :–** बी.एस्सी. भाग २ ला घेतलेल्या ऐच्छिक विषयांपैकी कोणताही एक विषय निवडता येईल.

१) रसायनशास्त्र (Chemistry)
२) भौतिकशास्त्र (Physics)
३) प्राणीशास्त्र ( Zoology )
४) गणित ( Mathematics)
५) वनस्पतीशास्त्र (Botany )
६) संख्याशास्त्र (Statistics)
७) संगणकशास्त्र (Computer Science)

टीप :– १) **संगणकशास्त्र भाग १,२,३ व संख्याशास्त्र व वनस्पतीशास्त्र भाग ३ हे विषय विनाअनुदानित आहेत.**

२) **महाविद्यालयामध्ये कोणत्याही वर्गात प्रवेश देण्याबाबतचे अथवा प्रवेश नाकारण्याचे अंतिम अधिकार प्राचार्यांना राहतील.**

### ■ प्रवेशाबाबतचे नियम :

महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज स्वीकारून महाराष्ट्र शासन व संस्था यांच्या वेळोवेळी ठरविलेल्या नियमाप्रमाणे गुणवत्तेवर आधारित प्रवेश दिला जाईल. याचे निकष पुढीलप्रमाणे –

१) विद्यार्थिनीसाठी ३० टक्के व माजी सैनिकांच्या पाल्यासाठी १०% प्रवेश राखीव राहील.

२) प्रवेश अर्ज मुदतीतच स्वीकारले जातील. या संदर्भातील सूचना, सूचना फलकावर लावली जाईल.

३) गुणवत्तेनुसार यादी सूचना फलकावर लावल्यानंतर, विद्यार्थ्यांनी दिलेल्या मुदतीतच प्रवेश घ्यावयाचा आहे.

४) प्रवेशासाठी लागणाऱ्या मूळ कागदपत्रांची पूर्तता प्रवेश घेतानाच करावयाची आहे.

१) शाळा सोडल्याचा मूळ दाखला व दोन सत्य प्रती
२) मूळ गुणपत्र व दोन सत्य प्रती
३) जातीचा दाखला
४) सवलतीचे अर्ज व त्यास पूरक कागदपत्रे व त्याच्या दोन प्रती.

| Sr.No. | Category of Reservation | Percenate Reservation |
|---|---|---|
| 1. | Scheduled Castes and Schedule caste to Buddhism **(SC)** | 13.0% |
| 2. | Scheduled Tribes **(ST)** | 7.0% |
| 3. | Vimukta Jati **(VJ)** / De notified Tribes **(DT) (NT-A)** | 3.0% |
| 4. | Nomadic Tribes 1 **(NT-B)** | 2.5% |
| 5. | Nomadic Tribes 2 **(NT-C)** | 3.5% |
| 6. | Nomadic Tribes 1 **(NT-D)** | 2.0% |
| 7. | Other Backward Classes **(OBC)** | 19.0% |
| 8. | **SBC** | 2.0% |
| | **Total** | **52%** |

## ■ शिकवण्याचे माध्यम :

अर्थशास्त्र, अकौंटन्सी, कॉमर्स, बँकिंग, संख्याशास्त्र व बी.कॉम. भाग ३ च्या सर्व विषयासाठी विद्यार्थ्याना इंग्रजी किंवा मराठी माध्यम स्विकारता येईल.

**अन्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत**

अ) शिवाजी विद्यापीठास संलग्न असलेल्या अन्य कोणत्याही महाविद्यालयातील विद्यार्थ्याला या महाविद्यालयात प्रवेश मिळविण्यासाठी पूर्वी शिकत असलेल्या महाविद्यालयाकडून संस्थांतर दाखला (Transference Certificate) सादर करणे आवश्यक आहे. असा संस्थांतर दाखला सादर करेपर्यंत त्या विद्यार्थ्याचा या महाविद्यालयातील प्रवेश केवळ तात्पुतरता ( Provisional ) असतो. याची विद्यार्थ्यानी नोंद घ्यावी.

ब) महाराष्ट्र राज्यातील शिवाजी विद्यापीठाखेरीज अन्य विद्यापीठातील तसेच महाराष्ट्र राज्याव्यतिरिक्त अन्य राज्यातील विद्यार्थ्याला या महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी खालील कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१) स्थलांतर दाखला ( Migration certificate )

२) संस्थांतर दाखला (Transference Certificate)

३) पात्रता प्रमाणपत्र (Eligilibility Certificate)

या सर्व कागदपत्रांची पूर्तता करणे ही विद्यार्थ्याची वैयक्तिक जबाबदारी राहील व शिवाजी विद्यापीठाने विहित केलेल्या वेळेत त्यांनी या कागदपत्रांची पूर्तता केली नाही तर त्यामुळे होणाऱ्या परिणामास संबंधित विद्यार्थी जबाबदार राहील.

## ■ FOR FOREIGN STUDENTS

At the time of admission in addition to Migration, Transference and Eligilibility Certificates, every foregin student will have to produce the Certificate of Permission issued by the Government of India.

Students from abroad and the children of Non-resident Indians who have been residing, working abroad for more than two years and seeking admission in this college shall have to undergo AIDS test and their admission will be confirmed only on the submission of Fitness Certificate.

## ■ फी संबंधीचचे नियम :

१) पूर्ण फी भरणाऱ्या विद्यार्थ्यांनी फीचा पहिला हप्ता प्रवेश घेतेवेळी व दुसरा हप्ता दुसरे सत्र सुरू झाल्यापासून १५ दिवसांच्या आत भरावयाचा आहे.

२) बी.ए./ बी.कॉम./ बी.एस्सी. भाग १ या वर्गात प्रवेश घेणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांस प्रवेश अर्जासोबत तक्त्यामध्ये दर्शविलेल्या फी शिवाय पात्रता प्रमाण पत्र शुल्क म्हणून रु. ७५/- आणि महाराष्ट्र राज्याबाहेरील विद्यार्थ्यास रु. ३००/- अधिकचे भरावे लागतील.

## ■ RULES FOR ADMISSIONS PREAMBLE

A) Inaccordance with the provisions of the Section of Maharashtra Universities Act, 1994 the following rules shall be callled Admission Rules to be applicable to the non - professional under - graduate and post graduate courses in the affiliated colleges/ recognised institute / University Departments/autonomous colleges.

B) The admission rules for professional courses shall be as prescribed by the State Government for time to time.

A.R, 1 Admission to non-professional undergraduate shall be strictly based on,

a) Eligilibility criteria as prescribed by the University fron time to time

b) Reservation rules as prescribed by the State Government form time to time and adopted by the University.

c) Merit as measured by the marks scored in the qualifying / previous examination,

d) In the case of courses where entrance tests are prescribed the admission shall be based on merit in the said entrance tests subjects to (a) and (b) above.

A.R. 2 In case of admission to under-graduate courses where the affilated college / reconized institution / autonomous college has an attached Junior College. the total intake capacity at the first point of the admission to theSenior College shall be divided as 80% for the attached Junior College and 20 percent for other Junior colleges,. However in both cases, the basic rules of merit, reservation, and eligilibility shall apply. If 20% qiuota remains unutilized students from the attached Junior College shall be admitted for the waiting list.

The merit of the students from other Junior Colleges shall not be less than the merit of the last student admitted for the attached Junior College In case 80 percent quota for the attached Junior College remains unutilized the College shall have the right to admit students from other Junior Colleges subjects to the general rules given above.

A.R. 3 In view of the problem of drop out, the additional 10 percent of the sancned intake capacity may be admitted in the affiliated college / recognised institution/ autonomous institution subjects to the general rules of the admission given above.

A.R. 4 In case of admission to the second and third year of integrated degree course, preference shall be given to the students of the same college / recognised institution / autonomous institution.

A.R. 5 Every affiliated college / recognised institution, autonomous institution Shall constitute for proper monitoring of admissions an Admission Committee consisting of the followoing members

1) Principal ( Chairman) 2) One teacher from each faculty
3) Registrar / Superintendent ( Secretary )

As soon as the procedure of preparing the merit list is completed the merit list along with the waiting list shall be displayed on the college notice board for the information of students

A.R. 6 Husband / Wife / Son / Daughter and Brother / Sister of both the teaching and non- teaching employees (on probation or confirmed ) be given admission to the courses within a limit of 3 percent of the Total intake capacity subject to intra-group merit considerations, This rule shall be applicabe to admission to courses / classes being conducted by the concerned institute, where the teaching / non teaching employee are working,

A.R. 7 In case of physically handicapped students, seeking admission to the first year of the integrated degree course, the Admission Committee may use its discretion subject to the fulfilment other conditions of admission.

A.R.8 The foregin students shall be admitted to any course in any institution /college afiliated to the university or in the autonomous institution on production of provisional eligilibility certificate from the University For job taining provisional eligilibility certificate, the foregin student shall apply along with necessary certificate, to the univcersity in the form prescribed by the university and pay fees as prescribed by the University from time to time.

Every foreign student, except those students nominated by the Central Government for medical courses shall have to appear for and pass the entrance examination to be conducted by the University and any other test including medical test as prescribed by the Govt. The fees for this examination as well as for re-examination will be as prescribed by the University form time to time

A.R. 9 **Cancellation of admission and refund of money :**

Cancellation of admisssion and refund of money shall be as under:

1) All deposits such as Caution Money, Library Deposit, Labouratory Deposit. etc. shall be refundable subject to such deductions as may be necessary on account of any damage to the property of the institution concerned such as breakages to laboratory equipments, loss of library boooks, etc. for which a student may be responsible. The application for refund of such deposits shall be made within six monys either from the date. he / she leaves the college or completes the courses and the said institution shall refund the amount within 30 days from the date of receipt of application.

2) Only tution fees and no other fees shall be refundable,.

3) Tution fees shall be refundable as under :

a) The entire amount paid by the students after deducation of 25% as administrative charges.

i) If a student gets his admission cancelled before the commencement of the academic term.

ii) If a student gets his admission to another college or institution providing

courses different from those in the college or institution to which he had first sought admission and paid tution fees provided always that he has kept the authorities of such a college or the institution informed in good time about his application for admission to another college or institution the application for refund of tution fees in such cases, must be forwarded through the Principal of the college or instution which the student actually joins, giving pertinent details such as the course selected by him, the date of his application for admission to the college or institution etc.

b) 50 percent of the amount paid by a student as tution fees, if he applies for cancellation of his admission and the refund of fees before the last date of admission to the college or the institution fixed by the University.

4) A Student shall not be entitled to claim refund of tution fees if he leaves the college or the institution, after the last date of admission to such college / institution.

5) In the case of a student, who fails to inform the autorities of the college or the institution to which he has been given admission, about his intention to leave or change the college or the institution such authorities shall be entitled to charge full fees for the term or the year as the case may be.

6) These rules shall not be applicable to colleges / institutions run by the state Government

7) In the case of students getting admission to professional courses in colleges, the claim for refund of tution fees etc. shall be made by concerned students within one week of admission to the professional courses and in such cases, the colleges shall deduct an amount of 10 percent of the fees paid as administrative charges. The seats failling vacent may be filled in by the college / recognised institution from the waiting list.

A.R. 10 At part-I, II and III level, efforts should be made by the college to ensure a fair distrubution of admissions to different special subjects

A, R. 11 **PROSPECTS :**

The affiliated college/recognised institution / autonomous institution shall make available a prospecuts of various course giving relevant information mainly with reference to the fees and courses structure, intake capacity etc. The prospectus should be reason ably priced, The prospectus should be made available at least 21 days before the commencement of the A Academic Year.
Every prospectus shall make it clear in the begining that the admissions are completely governed by rules and regulations made by the University from time to time. A copy of such rules and regulations should be displayed on the notice board of the college during the period of admission.

It shall be mandatory on the part of the college/recognised institution/autonomous institution to effectively advertise the schedule of admissions for the benefit of all students.

A. R. 12 Rules and regulations regarding admission fee, tution fee and various other fees to be charged by the affiliated college / recognised institution autonomous institution at under graduate leavels shall be governmed by the provisions of ordinance as pre scribed by the University from time to time.

It shall be the responsibility of the Principal to ensure that admissiions are as per rules, regulations and ordinance as prescribed by the University, from time to time.

## ■ प्रवेशाबाबत सूचना व नियम :

१) बी.ए. / बी.कॉम. / बी. एस्सी. भाग १, २ व ३ या सर्व वर्गासाठी अनुदानित व विना अनुदानित तुकड्या असतील.

२) प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची गुणानुक्रमे यादी तयार केली जाईल. अनुदानित व विनाअनुदानित तुकड्यामध्ये त्यांची नावे गुणानुक्रमे समाविष्ट केली जातील. सदर यादी महाविद्यालयाच्या माहिती फलकावर प्रसिद्ध केली जाईल. विना अनुदानित तुकड्यामध्ये प्रवेश मिळणाऱ्या विद्यार्थ्यांना शासन / विद्यापीठाच्या वेळोवेळी लागू होणाऱ्या नियमानुसार फी भरावी लागेल, याची त्यांनी नोंद घ्यावी.

३) नवीन अभ्यासक्रमानुसार १२ वी परीक्षा ( आर्टस्, कॉमर्स) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे त्या त्या शाखेतील (B.A./B.Com.) वर्गात प्रवेश मिळेल.

### ● प्रवेश अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे –

(बी.ए. / बी.कॉम./ बी.एस्सी. भाग १ या वर्गासाठी )

१) शाळा सोडल्याचा दाखला मूळ प्रत व दोन साक्षांकित झेरॉक्स
२) १२ वी च्या परीक्षेच्या गुणपत्रकाची मूळ प्रत व दोन साक्षांकित झेरॉक्स
३) पात्रता प्रमाणपत्र अर्ज
४) पासपोर्ट साईजचा एक फोटो

### ● महत्वाची सूचना –

प्रवेश घेतल्यानंतर १२ वी चे मूळ गुणपत्रक जानेवारी महिन्यात परत मिळते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी स्वत:जवळ गुणपत्रिकेच्या पुरेशा झेरॉक्स प्रती काढून ठेवाव्यात. नोकरीसाठी अथवा शिष्यवृत्तीच्या अर्जासोबत गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक असते म्हणून वेळीच वरील सूचनेची नोंद घ्यावी.

### ● बी.ए. / बी. कॉम. / बी.एस्सी. भाग २ व ३ या वर्गासाठी –

१) मागील परीक्षा उत्तीर्ण केलेल्या गुणपत्रिकेची एक साक्षांकित झेरॉक्स प्रत
२) शिवाजी विद्यापीठ कक्षेतील अन्य महाविद्यालयातून परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी टी.सी. मागणी अर्ज कार्यालयातून घेऊन योग्य त्या माहितीसह प्रवेश अर्जास जोडावा. तसेच त्या सोबत संबंधित कॉलेजच्या नावे टी.सी.फी म्हणून आय.पी.ओ. रु. ५०/– जोडावी.

### ● डी. एड. झालेल्या विद्यार्थ्यांसाठी –

१) एस. एस. सी. परीक्षा इंग्रजीसह उत्तीर्ण झालेले मूळ गुणपत्रक व दोन साक्षांकित झेरॉक्स प्रती.
२) डी.एड. कॉलेज सोडल्याचा दाखला – मूळ प्रत व दोन साक्षांकित झेरॉक्स
३) डी. एड. उत्तीर्ण झाल्याचे मूळ गुणपत्रक व दोन साक्षांकित झेरॉक्स
४) पासपोर्ट साईज Latest फोटो

### ● पात्रता प्रमाणपत्र (Eligibility Certificate ) -

टीप : हा फॉर्म काळ्या शाईच्या पेनने/बॉलपेनने भरणे आवश्यक)

१) बी.ए. / बी.कॉम./ बी.एस्सी. भाग १ मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश अर्जासोबत पात्रता प्रमाणपत्र अर्ज भरावा. त्यासाठी पात्रता शुल्क रु.५०/– भरावे लागतील.

२) डी. एड्. झालेल्या विद्यार्थ्यांनी बी.ए. भाग १ मध्ये प्रवेश घेताना प्रवेश अर्जावर पिवळ्या रंगाचा पात्रता अर्ज भरावा. त्यासाठी पात्रता शुल्क रु. १५०/– भरावे लागेल.

३) विद्यापीठाकडून प्रवेश पात्रता ठरल्यानंतरच वरील वर्गात प्रवेश निश्चित होतो. म्हणून विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जाबरोबरच पात्रता – प्रमाणपत्र अर्ज भरावा अन्यथा प्रवेश रद्द केला जातो याची नोंद घ्यावी.

**● फी सवलत –**

महाविद्यालयाची फी माफीसाठी विद्यार्थ्यांना सरकारकडून मिळणाऱ्या खालील प्रकारच्या एकाच फी माफी सवलतीचा लाभ घेता येईल.

१) **ई.बी.सी.** ज्या विद्यार्थ्याचे पालकांचे उत्पन्न रु. १,००,०००/– पेक्षा कमी आहे. अशा विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येईल. (इतर नियम अंतिम तक्त्यात पहावेत.)

२) **पी.टी.सी.** ज्या विद्यार्थ्याचे आई अथवा वडील प्राथमिक शिक्षक आहेत.

३) **एस.टी. सी.** ज्या विद्यार्थ्यांचे आई अथवा वडील ५ वी ते ७ वी पर्यंत डी. एड. स्केलवर शिक्षक म्हणून काम करतात.

४) **फ्रिडम फायटर** ज्या विद्यार्थ्याचे आई वडील स्वातंत्र्यसैनिक होते.

५) **एक्स जवान** ज्या विद्यार्थ्याचे वडील पूर्वी मिलिटरी सेवेमध्ये होते, त्यांनी अर्जासोबत जिल्हा सैनिक बोर्डाकडून मिळणारे प्रमाणपत्र जोडून या सवलतीचा अर्ज केल्यास फक्त फी माफी मिळते. १२ वी पर्यंत गणवेश तसेच पुस्तकासाठी अनुदान मिळते.

६) **जवान** ज्या विद्यार्थ्याचे वडील मिलिटरी सर्व्हिसमध्ये आहेत. अशानी विहीत नमुन्यात अर्ज करावा व त्यासोबत वडील मिलिटरीसेवेमध्ये असल्याबाबतचा जिल्हा सैनिक बोर्डाकडून मिळणारा दाखला जोडावा. वरील सवलतीचे अर्जाचे नमुने माधव प्रिंटिंग प्रेस, तासगांव येथे उपलब्ध असून विद्यार्थ्यांनी आपण पात्र असलेल्या सवलतीचा अर्ज प्रवेश अर्जासोबत जोडावा. त्याशिवाय प्रवेश दिला जाणार नाही.

**● भारत सरकार शिष्यवृत्त्या –**

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना (अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त व भटक्या जमाती ) भारत सरकारकडून शिष्यवृत्ती मिळते. अर्जाचा विहित नमुना कार्यालयात मिळेल. अर्जाचा विहित नमुना कार्यालयात मिळेल. सदर शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याची ३१ जुलै २०१४ ही अंतिम तारीख आहे. अनुत्तीर्ण झालेल्या मागास विद्यार्थ्याने त्याच वर्गात पुन्हा प्रवेश घेतल्यास फक्त फी माफी व परीक्षा फी मिळते. अर्ज मुदतीत कार्यालयात सादर करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील.

**● याशिवाय गुणी विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती –**

राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती, राज्य सरकारची शिष्यवृत्ती, अहिंदी भाषिक विद्यार्थ्यांना मिळणारी हिंदी शिष्यवृत्ती, विद्यापीठ मेरीट शिष्यवृत्ती, विद्यापीठ सामाजिकशास्त्रे शिष्यवृत्ती, अपंग विद्यार्थ्यांना मिळणारी अपंग शिष्यवृत्ती, राष्ट्रीय कर्जाऊ शिष्यवृत्ती इ. विविध शिष्यवृत्त्यासाठी अर्ज करावा.

**● विद्यार्थी सहाय्य निधी –**

अत्यंत गरीब परंतु हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना काही प्रमाणात गरजेप्रमाणे मदत केली जाते. संबंधित गरजू विद्यार्थ्यांनी मा. प्राचार्यांना भेटून याचा लाभ घ्यावा.

## ■ महाविद्यालयातील इतर सोयी –

१) सुसज्ज ग्रंथालय व अभ्यासिकेची सोय.
२) भव्य जिमखाना हॉल तसेच ४०० मीटर रनिंग ट्रॅक व विविध देशी–विदेशी खेळांची मैदाने, होतकरू विद्यार्थ्यांना विविध खेळाच्या सरावासाठी मार्गदर्शन.
३) कला सांस्कृतिक मंडळामार्फत विद्यार्थ्यांना गायन, वादन, लोकनृत्य, लोकगीत वगैरे स्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी मार्गदर्शन.
४) वार्षिक नियतकालिक 'संस्कार' दरवर्षी प्रसिद्ध केले जाते. त्यामध्ये कथा, कविता, लेख तसेच फोटोग्राफी, चित्रकला इत्यादी विपुल साहित्याद्वारे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव दिला जातो.
५) २०० विद्यार्थ्यांचा सहभाग असलेले राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.) युनिट
६) एन. सी.सी. (N.C.C.) युनिट
७) महाविद्यालयाच्या कार्यक्रम विभागामार्फत दरवर्षी किमान ५/६ प्रसिद्ध लेखक, कवी, विचारवंतांची व्याख्याने आयोजित केली जातात.
८) विविध ठिकाणी होणाऱ्या वाद–विवाद, वक्तृत्त्व, निबंध स्पर्धेसाठी होतकरू विद्यार्थ्यांना मार्गदर्शन.
९) नियोजन मंडळ, लोकसंख्या शिक्षण मंडळ या विभागामार्फत विविध कार्यक्रम आयोजित केले जातात.
१०) नोकरी व व्यवसायाविषयी मार्गदर्शनासाठी विद्यार्थ्यांना वैयक्तिक तसेच एकत्रित शिक्षण वर्ग तसेच विशेष सूचना फलक लावून माहिती पुरविली जाते.
११) या महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन होत नाही त्याऐवजी एक दिवसाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ होईल. या समारंभावेळी इतर कोणतेही कार्यक्रम न होता केवळ पारितोषिक वितरण होईल. या संदर्भात नंतर तक्रार चालणार नाही.
१२) शैक्षणिक सहली, हायकिंग याद्वारे विद्यार्थ्यांचे निसर्गाशी नाते निर्माण केले जाते.
१३) विद्यार्थ्यांच्यासाठी विमा (विद्यापीठ) योजनेची सोय आहे.
१४) महाविद्यालयात सी.सी. टी.व्ही. असल्याने विद्यार्थी पूर्णपणे सुरक्षित आहेत.

## ■ कॉलेजचे नियम :

१) कॉलेजमधील प्रत्येक तासाला, टेस्टला, सहामाही व पूर्व परीक्षेला नियमित व वेळेवर उपस्थित असले पाहिजे. महाविद्यालयात तासाला ८०% उपस्थिती आवश्यक आहे. अन्यथा टर्म ग्रॅन्ट न झाल्याने विद्यापीठ परीक्षेस बसता येणार नाही.
२) कॉलेजमध्ये प्रवेश घेतल्यावर प्रत्येक विद्यार्थ्याजवळ स्वतःचे ओळखपत्र (Identity Card) असणे आवश्यक आहे. प्रत्येकाने नवीन ओळखपत्र घ्यावे व त्यावर आपला सध्याचा (लेटेस्ट) फोटो लावून दि. ३१–७–२०१६ पर्यंत त्यावर प्राचार्यांची सही घ्यावी. त्यानंतर ओळखपत्रावर सही होणार नाही. ओळखपत्र न हरविण्याची दक्षता विद्यार्थ्यांनी घ्यावी.

३) ओळखपत्र हरवल्यास रु. २५/- दंड भरून नवीन (Duplicate) ओळखपत्र दिले जाईल.

४) आयकार्डावरील फोटोचा उपयोग अन्य कारणासाठी केल्याचे आढळल्यास रु.५०/-दंड केला जाईल.

५) वर्ग चालू असताना मधूनच वर्गात जाता अथवा वर्गाबाहेर येता येणार नाही. या काळातील गैरशिस्त आढळल्यास तो शिक्षेस पात्र होईल.

६) इतर वर्गांना आपल्या वर्तनाने कोणताही उपद्रव होणार नाही याची दक्षता घ्यावी.

७) कॉलेजच्या प्रतिष्ठेला व शिस्तीला बाधा येईल असे कोणतेही वर्तन विद्यार्थ्याने कॉलेजात अथवा कॉलेज बाहेर करता कामा नये. आपण सी.सी. टी.व्ही. समोर आहात हे लक्षात घ्यावे.

८) कॉलेज आवारात प्रवेश करताना प्रत्येक विद्यार्थ्याजवळ आपले ओळखपत्र असणे सक्तीचे राहील. ज्या विद्यार्थ्याजवळ ओळखपत्र नसेल त्या विद्यार्थ्यावर महाविद्यालय कायदेशीर कार्यवाही करेल.

९) कॉलेजमध्ये आल्यावर नोटीस बोर्ड वाचण्याची विद्यार्थ्यांनी सवय ठेवावी.

१०)एन.सी.सी.मध्ये भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी एन.सी.सी. किटस् वर्षाअखेरीस सुस्थितीत परत करावी. तसेच नियमित परेडसाठी उपस्थित असले पाहिजे.

११)एन. एस.एस. मधील विद्यार्थ्यांनी नोटीसीद्वारे कळविल्याप्रमाणे श्रमदान अथवा नियमित कार्यक्रमास हजर राहावे.

१२)महाविद्यालयाच्या परिसरात असभ्य वर्तन करणे, परीक्षा काळात गैरवर्तन केल्यास कठोर शिक्षा केली जाईल.

१३) महाविद्यालयात मोबाईलचा वापर करता येणार नाही.

१४) महाविद्यालयात गैरहजर राहणाऱ्या व ८०% पेक्षा कमी हजेरी भरणाऱ्या विद्यार्थ्यांचा परीक्षा फॉर्म भरला जाणार नाही.

१५) वॉचमेनच्या आदेशाचे उल्लंघन ही बाब बेशिस्त वर्तन समजले जाईल.

## ■ परीक्षेसंबंधी सूचना :

१) प्रत्येक सत्रासाठी नियुक्त केलेले स्वाध्याय तसेच पूर्ण केले पाहिजेत. सत्र परीक्षेस विद्यार्थ्यांनी हजर असले पाहिजे.

२) बी.ए. भाग १, बी. कॉम. भाग १ व बी.एस्सी. भाग १ या वर्गात शारीरिक शिक्षण हा विषय सक्तीचा असून त्यासाठी १० गुण असतात. या परीक्षेतील गुणवत्तेवर सदर गुण मिळतात.

## ■ कार्यालयाचे नियम :

१) कार्यालयाची वेळ सोमवार ते शुक्रवार सकाळी ८-०० वा. ते दुपारी १२-३० वा. दुपारी २-३० वा. ते सायंकाळी ५-३० वा., शनिवारी सकाळी८-०० वा. ते दुपारी १२-३० वा. अशी राहील. या वेळेमध्ये विद्यार्थ्यांनी आपली कामे करून घ्यावीत. प्रवेश देण्याचे कामकाज सकाळी ८-३० ते १२-३० या वेळेतच राहील.

२) ग्रंथालय अथवा प्रयोगशाळा डिपॉझिट प्रतिवर्षी १६ ऑगस्ट ते १५ ऑक्टोबर या कालावधीत परत मिळतील. वरील कालावधी व्यतिरिक्त डिपॉझिट परत मिळणार नाही. तसेच कॉलेज सोडल्यावर एक वर्षात डिपॉझिटची रक्कम परत न घेतल्यास लॅप्स झाल्याने रक्कम परत मिळणार नाही.

३) विद्यार्थ्यास कॉलेज बदल करावयाचे असल्यास अथवा बहि:स्थ म्हणून विद्यापीठाकडे रजिस्ट्रेशन करावयाचे असल्यास संबंधीत कॉलेज अथवा विद्यापीठाकडे टी.सी. पाठविला जाईल. विद्यार्थ्यांना हातात (By hand) टी.सी. मिळणार नाही. यासाठी विद्यार्थ्यांनी ज्या ठिकाणी प्रवेश घेतला असेल तेथूनच टी.सी. मागणी अर्ज या कॉलेजकडे पाठवावा.

४) विद्यार्थ्यास कार्यालयाकडून काही हवे असल्यास आदल्या दिवशी संबंधित लेखनिकास भेटून तसा अर्ज द्यावा व दुसऱ्या दिवशी पूर्तता करून घ्यावी.

## ■ महाविद्यालयाची वेळ :

कला व वाणिज्य वर्ग सकाळी ०८.०० ते दुपारी ०१.०० पर्यंत राहील.
विज्ञान शाखेचे वर्ग सकाळी १०.३० वा. ते दुपारी ०४.३० पर्यंत राहील.
पदवीव्युत्त वर्ग (एम.ए./एम.एस्सी.) दुपारी ०२.३० ते ०५.३० पर्यंत राहील.

## ■ ग्रंथालयाबाबत विशेष माहिती :

महाविद्यालय परिसराच्या मध्यभागी चार हजार स्क्वेअर फूट बांधकाम असलेले सुसज्ज ग्रंथालय हे तासगाव तालुक्यातील जुने व मोठे ग्रंथालय आहे. ग्रंथालयामध्ये जवळपास सत्तावन्न हजार ग्रंथ, पासष्ट साप्ताहिके उपलब्ध आहेत. सदर ग्रंथालयात दुर्मिळ संदर्भ ग्रंथ, साप्ताहिके, विद्यार्थी अभ्यासिका व प्रशासन असे विभाग आहेत.

**ग्रंथालयातील सुविधा व उपक्रम पुढीलप्रमाणे –**

- १०० विद्यार्थी क्षमतेची स्वतंत्र अभ्यासिका विद्यार्थ्यांसाठी वाचन कट्ट्याच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध.
- गुणवत्ताधारक व गरीब विद्यार्थ्यांच्यासाठी क्रमिक पुस्तकांचा संच
- मा. श्री. आर. जी. सावंत ( विकास अधिकारी, एल.आय.सी., तासगाव) यांचेमार्फत एका विद्यार्थ्यासाठी व एका विद्यार्थिनीसाठी 'उत्कृष्ट वाचक पुरस्कार'
- तासगाव तालुक्यातील महाविद्यालयेत्तर वाचकांच्यासाठी 'बहि:स्थ सभासद योजना'
- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक केंद्र तासगाव स्पर्धा परीक्षा, एम.एच.सी.ई.टी. विद्यार्थ्यांच्यासाठी 'विशेष सभासद योजना'
- भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती, ग्रंथप्रदर्शन, नवीन ग्रंथपरिचय, ग्रंथालयाबाबत विद्यार्थी प्रशिक्षण, वाचक सर्व्हेक्षण आपण वाचलेल्या पुस्तकांवरील समीक्षणासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाईल.

**ग्रंथालयाचे नियम –**

१) विद्यार्थ्यास कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला म्हणजे तो ग्रंथालयाचा सभासद होण्यास पात्र ठरतो. सदर विद्यार्थ्यास एक ग्रंथालय सभासद कार्ड देण्यात येते. सदर कार्ड ३० सप्टेंबर

पर्यंत दिले जाईल याची नोंद घ्यावी. जर हे कार्ड हरवले तर रु. २० भरून दुसरे कार्ड मिळविता येते.

२) ओळखपत्र (Identity Card) बरोबर आणल्याशिवाय ग्रंथालयात प्रवेश मिळणार नाही.

३) प्रत्येक विद्यार्थ्यास 'डिमांड स्लिप' मिळते. ग्रंथालयातील पुस्तके मिळविण्यासाठी प्रत्येक वर्गाकरिता विशिष्ट एक दिवस निश्चित केलेला असतो. विद्यार्थ्याने डिमांड स्लिप भरून आधी नेलेली पुस्तके या निश्चित केलेल्या दिवसापूर्वी एक दिवस आधी ग्रंथालयात जमा करणे आवश्यक असते.

४) विद्यार्थ्यास एका आठवड्याकरिता एक पुस्तक देण्यात येते. जर एका आठवड्यात विद्यार्थ्याने पुस्तक परत केले नाही तर त्यास पुढील प्रत्येक दिवसाकरिता दोन रूपये प्रमाणे दंड भरावा लागेल. तसेच ओळखपत्रावरील पुस्तकासाठी १ रु व पुस्तक संचासाठी दररोज रु.५ दंड भरावा लागेल.

५) जर विद्यार्थ्याने पुस्तक हरविले किंवा त्याची काही पाने फाडली किंवा ते पुस्तक खराब केले असेल तर त्यास नवीन पुस्तक आणून ग्रंथालयात जमा करावे लागेल किंवा पुस्तकाच्या किंमतीच्या दुप्पट किंमत किंवा सदर पुस्तकाची सध्याची पूर्ण किंमत किंवा यापैकी जी जास्त असेल ती किंमत भरावी लागेल.

६) संदर्भ ग्रंथ, विश्वकोश, शब्दकोश, अभ्यासक्रम सूची ( सिलॅबस), प्रश्नपत्रिका संच, नियतकालिके, पाठ्यपुस्तके इ. विद्यार्थ्यांना अभ्यासिकेत ओळख पत्रावर देण्यात येतात. तसेच विद्यार्थ्याने ग्रंथालयातून / अभ्यासिकेच्या बाहेर जाण्यापूर्वी ती जमा करावीत. ती अभ्यासिकेच्या बाहेर नेता येणार नाहीत.

७) कॉलेज वेळोवेळी जे नियम करील त्याचे पालन विद्यार्थ्यांना करावे लागले. सदर नियम ग्रंथालयातील काचफलकामध्ये पाहवयास मिळतील.

८) 'पुस्तक पेढी' ( बुक बँक ) योजनेतून क्रमिक पुस्तकांचा संच त्या पुस्तकाच्या किंमतीच्या २५% रक्कम भरून वर्षभर वापरण्यास दिला जातो. वर्षाच्या शेवटी सदर सर्व पुस्तके ग्रंथालयात जमा करावी लागतात.

९) आपल्या विषयाचा तास नसतो तेव्हा ग्रंथालयातील अभ्यासिकेत बसता येईल.

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004. MAHARASHTRA
PHONE : EPABK - 2609000
FAX 0091-0231- 2691533 & 0091-0231-2692333 - BOS-2609094
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४
दुरध्वनी : (ईपीबीएक्स) २६०९००० (अभ्यास मंडळे विभाग-२६०९०९४)
फॅक्स : ००९१-०२३१-२६९१५३३ व २६९२३३३. Email : bos@unishivaji.ac.in

Accredited By NAAC (2009)

